VOL- XI ISSUE- II FEBRUARY 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

# 1960 नंतरचे ग्रामीण साहित्यातील लेखकांनी केलेले स्त्री चित्रण

**डॉ. वंदना विनायक नढे**
मराठी विभागप्रमुख
श्री शिव छत्रपती महाविद्यालय,
ता.जुन्नर, जि. पुणे 410502
Email –drnadhevv@gmail.com

**प्रास्ताविक –**

1960 नंतर सर्वच क्षेत्रात बदल घडला त्याला साहित्य अपवाद नाही. साहित्यात सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय चित्रण होऊ लागले. बदलेल्या मानवी मनात दुष्काळविषयी भिती वाढली, समाजात सामाजिक, आर्थिक शोषण वाढले, स्वार्थ बोकाळला व नीत्तीमत्ता नष्ट झाली.

ग्रामीण साहित्य ही मराठी साहित्यातील एक महत्त्वाची संकल्पना उदयास आली. या संकल्पनेतील 'ग्रामीण' हे विशेषण मराठी साहित्यात रूढ होण्यापूर्वी 'ग्राम', 'नागरी' आणि 'ग्रामीण' या संकल्पना साहित्यात प्रचलित होत्या. त्या सामाजिक संदर्भातून निर्माण झालेल्या होत्या. ग्रामीण वास्तव, ग्रामीण संस्कृती आणि ग्रामीण बोली याचा वापर करणारे साहित्य, खेडी व त्याचा परिसर, त्यात वावरणारी माणसे, त्यांचे जीवन हे ग्रामीण साहित्याचे कथनस्थान होते.

खेड्यातील माणसांच्या जीवनरिती , श्रद्धाविश्वे, शेती व निसर्ग यांच्याशी असणारा भावबंध, ग्रामव्यवस्थेतील बलुतेदारी, सामाजिक, आर्थिक संबंधाची पारंपरिक व्यवस्था, आधुनिक काळात आलेली पंचायतव्यवस्था, सहकारतत्वावर चालणाऱ्या विविध संस्था, यंत्रसंस्कृतीचे ग्रामीण जीवनावर झालेले आक्रमण व त्याचे परिणाम, आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेने बदलत चाललेले ग्रामीण जीवन, तेथील व्यक्ती आणि समूह यातील ताण ही ग्रामीण साहित्याची आशयसूत्र असतात, असे वाङ्मयीन संज्ञा व संकल्पनाकोशात स्पष्ट केले आहे.

'ग्रामीण' हा शब्द ग्रामीण समाजव्यवस्थेशी, एकूणच भारतीयांच्या ग्रामीण जीवनाशी निगडित आहे, असे आनंद यादव म्हणतात.

तर नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात की, 'ग्रामीण साहित्य' हे व्यक्तीकेंद्रित तर असतेच पण त्या व्यक्तिमनाच्या जडणघडणीत कृषीकेंद्रित संस्कृती, या संस्कृतीने निर्माण केलेला लोकमानस, या संस्कृतीसाठी निर्माण झालेला गावगाडा किंवा तत्सम कृषी उपयोगी समाजरचना इत्यादी घटक जबाबदार असल्याने त्या व्यक्तिमत्त्वाला केंद्रस्थानी ठेवून लिहीत असताना उपरोक्त घटक सहजपणे ध्वनीत होत जातात आणि त्यातूनच ग्रामीण साहित्य आकार घेत जाते.

ग्रामीण साहित्य म्हणजे काय हे सांगताना गो.म.कुलकर्णी म्हणतात, 'ग्रामीण साहित्य म्हणजे खेडेगावातील कृषीवर निर्वाह असलेल्या स्पृश्य शेतकऱ्यांच्या आणि स्पृश्य शेतमजुरांच्या जीवनावर आधारलेले साहित्य होय'. 'ग्रामीण साहित्य ज्यात आजचे व कालचे ग्रामीण जीवन, त्यांचे मनोव्यापार, सांस्कृतिक संवेदन, सखोलपणे व सर्वांगीण स्वरूपात व्यक्त होते, असे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य' अशी त्यांनी संकल्पना मांडली

एकंदरीतच, ग्रामीण साहित्याच्या 'ग्रामीण' या संकल्पनेत ग्रामीण जीवन हा अर्थ अभिप्रेत आहे. ग्रामीण माणसाचे जगणे, त्याचा व्यवसाय, कृषीसंस्कृतीशी त्याचे असलेले नाते, ग्रामीण जीवनातील आचार-विचार, रुढी-प्रथा, भाव-भावना, ताण-तणाव, त्यांच्या जगण्यातील प्रश्न, त्यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी इत्यादी 'ग्रामीण' या संकल्पनेत महत्त्वाचे आहे. अशा या ग्रामीण जीवनाचा अविष्कार घडविणारे साहित्य म्हणजे 'ग्रामीण साहित्य' असे म्हणता येईल.

1960 नंतर ग्रामीण वातावरणात बदल घडत गेला 1960 पर्यंतचे ग्रामीण कादंबरीकार हे प्रामुख्याने शहरातून खेड्यात आलेले किंवा समाजातील मध्यमवर्गीय पांढरपेशी वर्गातील खेड्यातून शहरात नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने स्थायिक झालेले होते.

1960 नंतर हळूहळू ही परिस्थिती बदलत गेली. मध्यमवर्गीय समाजातील लेखकांबरोबरच प्रत्यक्ष कष्टकरी ग्रामीण समाजातून आलेले संवेदनशील लेखकही लिहू लागलेले दिसतात.त्यांच्या कादंबऱ्यातून व्यक्त होणाऱ्या जाणीवा ह्या ग्रामीण माणसाच्या मूलभूत जाणीव आहेत, असे चित्रित झाले.

**उद्धव शेळके-धग**(1960) - या कादंबरीतून 'कौतिक' या कादंबरी नायिकेची व्यथा- वेदना तिच्या जिद्दीसह प्रकट झालेली आहे. ग्रामीण कुटुंबातील एका शिंपी जातीच्या कौतकिचा दुर्दैवी नशिबाशी चाललेला संघर्ष उद्धव शेळके रेखाटतात. कादंबरीचे निवेदन पात्रमुखी म्हणजे कौतकिच्या मुखातून आले आहे. कौतिकची चिवट झुंज आणि नियतीने पदरात घातलेले अपयश शोकात्म भावनेला आवाहन करते. जन्माभर नाकर्ता नवरा, मुलगा यांच्यासह संसार उभा करण्यात झुंज दिलेल्या कौतिकची म्हणजे हाडामासांच्या ग्रामीण स्त्रीची व्यक्तिरेखा येथे साकारली आहे.

**रणजित देसाई-माझा गाव** (1960)- यात स्वातंत्र्यपूर्व काळातील खेडे चित्रित केलेले असून स्त्रियांना दुय्यमत्व दिलेले दिसते. यातील 'काळी' हे पात्र सौभाग्याचे मरण मागणारी तर 'उमा' ही खानदानी मराठा घरातील स्त्री. जी पतीच्या रंगेलपणावर पांघरून घालण्याचा प्रयत्न करते. या कादंबरीत जुन्या पारंपरिक गावाचे कॅनव्हस चित्र ते साकार करतात.

**दि. बा. मोकाशी- देव चालले** (1961)- ग्रामीण लोकमानसाच्या परंपरागत श्रद्धाविश्‍ वाचे दर्शन घडविणारी वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी आहे. यात बालविधवा 'सीताकाकू' पुतण्यांवर प्रेम करणारी, मायाळू, समजदार व श्रद्धाळू अशी स्त्री आहे. प्रेमाचा एकएक धागा जोडला व सर्व धागे निसटले. शेवटी 'देवा' चा धागा निसटल्याने ती अस्वस्थ, उदास होते. वृत्तीने कणखर असूनही तिच्या श्रद्धेला तडा गेल्याने ती विफल होते. सर्व कुटुंबाला एकत्र ओवून ठेवणारा देव आणि धर्माविषयी श्रद्धांचा धागा काळाच्या ओघात कसा विरत चालला आहे, हे या कादंबरीत दाखवून दिले. पळसगावच्या जोश्यांच्या घरातील आबा, जगू, नरू, आणि रामू चारही भाऊ शेती करणे शक्य नाही, म्हणून पोटासाठी शहरात गेले आणि तिकडेचच झाले. कितीतरी वर्षांनी सात पिढ्यांपासूनचे देव नेण्याच्या निमित्ताने हे सर्व भाऊ एकत्र येतात परंतु हे एकत्र येणे शेवटचे ठरावे , एवढे ते एकमेकांपासून दुरावले जातात.

**शंकर पाटील- टारफुला** (1964)- यात सुभानाराव पाटलाची विधवा, निपुत्रिक पत्नी पाटलीणबाई चित्रित केली आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील ढासळलेली ग्रामीण अर्थव्यवस्था, यात सामान्य माणसाचा बळी, याचे दारून वास्तव या कादंबरीत दिसते . कोल्हापूर संस्थानातल्या आडगावची कथा. आजूबाजूच्या परिसरात दरारा असणारा गावचा संरक्षक पाटील एके दिवशी अचानक मरण पावतो आणि गावगाड्यात सत्तासंघर्षाची खीळ बसते. पिढीजात वैरी गायकवाड आणि केरूनाना पवार हे सत्ता हस्तगत करण्यासाठी आपलाच मुलगा दत्तक घेतला जावा म्हणून प्रयत्न करू लागतात. गावचे कुलकर्णी आबा स्वभावाने मवाळ असल्याने बिघडत चाललेली परिस्थिती सावरू शकत नाही. अनागोंदीच्या वातावरणात एके दिवशी त्यांचाही खून होतो.

**हमीद दलवाई — इंधन**(1965)- स्वातंत्र्योत्तर काळातील हिंदू- मुस्लिम संबंधातून निर्माण झालेले ताणतणाव या कादंबरीत चित्रित झाले. या कादंबरीतील मुस्लिम भाभी, ब्राम्हणाची सुमती, महाराची लक्ष्मी, सुदामची सून, वाण्याची बायको, परटीण, मराठीण, कुळवाडीण, न्हाव्याच्या बायका अशा विविध जाती-धर्माच्या स्त्री व्यक्तिरेखा चित्रित केल्या. यातील भाभी कोकणातील मुस्लिम घरातील आहे, तिला मुलबाळ ऩाही म्हणून ती दुःखी आहे. भाभीचा नवरा इसाक शिक्षक असून ब्राम्हण सुमतीशी संबंध ठेवतो. तरी भाभी पती हाच परमेश्वर मानते. त्याच्या अनैतिकवृत्तीविरुद्ध ती बंड करीत नाही. महालक्ष्मीच्या पालखीच्यावेळी हिंदू-मुस्लिम दंगे होऊन स्त्रियांच्या अब्रूवर घाला घातला जातो. भाभीवरही असाच प्रसंग ओढवतो याचे आगतिकतेचे चित्र हमीद दलवाई यांनी साकारले.

**आनंद यादव- गोतावळा**(1971)- यात रामू सोनावडे यांची बायको व मुलगी यांचे अस्पष्ट चित्रण आले आहे. गोतावळ्यामध्ये भारतीय कृषीसंस्कृतीवर यंत्रसंस्कृतीचे आक्रमण गोतावळा उध्वस्त झालेल्या नारबाची मनस्थिती चित्रित झालेली आहे. कोल्हापूर कागल परिसरातले एका

खेडेगावात सालगडी म्हणून काम करणाऱ्या नारबाची ही आत्मकथा. आई-बाबाविना वाढलेला हा पोर रामू सोनवडेच्या शेतात कामाला म्हणून राहतो आणि गुराढोरांबरोबर तोही एक ढोर होऊन जातो पण तो आपले माणूस पण विसरू शकत नाही. माणूस म्हणून तो एकटा पडत जातो आणि म्हणूनच आपल्याभोवती आपली सहवासाची गरज भागवण्यासाठी गोतावळा निर्माण करत जातो."माणूस असूनबी जनावरात जगणं आणि जनावरात असून जनावर न्हाई", त्याने निर्माण केलेल्या गोतावळ्याशी तो भावनिकदृष्ट्या एवढा बांधला गेला आहे की माणसापेक्षा तोच त्याला जवळचा वाटतो. आणि गोतावळा नष्ट होत जातो तसतसा नारबाही उद्ध्वस्त होत जातो.

**रा रं. बोराडे-पाचोळा** (1971)- यातील गंगाराम हा साधा शिंपी कपडे शिवून आपला उदरनिर्वाह करणारा पण गराडाचा पोरगा बापाच्या धोतराला दंड घाला म्हणून गंगारामच्या मिसनीवर धोतर फेकतो. त्याला गंगाराम नकार देतो. म्हणून अपमानाचा सूड घेण्यासाठी गरडाचा पोरगा नव्या फॅशनच्या मशीनवाल्याला गावात आणतो व गंगारामचे गिऱ्हाईक वळवतो. गंगाराम भानाला प्रशिक्षित मशीनवाला बनवू इच्छितो पण भाना त्याला नकार देतो व कुटुंबाची वाताहात होते. पारबती गंगारामच्या आडदांड स्वभावामुळे दु:खी होते. तो हटवादी, एककल्ली, संतापी असल्याने तिच्या जीवनाची फरपट होते. पारबती दैववदी, संकटसमयी देवाचा धावा करणारी आहे. येथे पारबतीच्या चित्रणातून एका मराठी स्त्री जीवनाचा दु:खमय आलेख प्रकट होतो. यात स्वातंत्र्योत्तर काळात खेड्यातील पारंपरिक व्यवसाय कसे मोडकळीस येतात याचे चित्रण आले आहे.

**ना. धो,. महानोर – गांधारी** (1973)- यात गुलाबबाई, हौसा,जाईबाई, सारजा, शेवंता यांना दुय्यम स्थान दिले आहे. या कादंबरीत स्वातंत्र्यपूर्व काळात रझाकारी जुलुमाखाली आणि स्वातंत्र्योत्तर काळात जगदेवसारख्या गावठी पुढाऱ्याच्या कारवयांखाली भरडून निघाणाऱ्या खेड्याचे वास्तवदर्शी चित्रण आले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर निजामी अमलाखाली असलेला मराठवाडा पोलीस ॲक्शन होऊन स्वतंत्र झाला. परंतु स्वातंत्र्याची फळे या समाजाला चाखायला मिळाली नाहीत. रझाकरांचा जुलूम संपला, परंतु आता नव्या राजकारण्यांचे थैमान सुरू झाले. या हिणकस प्रवृत्तीने गांधारी सारख्या खेड्याचे जीवन पोखरले गेले. गचाळ राजकारणात ग्रामीण माणूस होरपळून निघाला. गांधारीचे नष्टचर्य संपले नाही. एक स्त्री म्हणून जयवंताची होणारी कुचंबणा, तिच्या अतृप्त वासनांच्या चित्रणातून लेखकाने दाखवली. हरिबा, येडाकाका, हौसा, गुलाब, गंगा इत्यादी पात्रांच्या मराठवाडी बोलण्यातून आणि त्याच्या घटनाप्रसंगातून ग्रामीण वातावरणनिर्मिती केली आहे

**नामदेव ढसाळ – हाडकीहाडवळा**(1981) यात गावशिवाचे व गावातील विषमतेचे चित्रण येते. हाडकी हाडवळा म्हणजे महारांना मिळालेली सामूहिक इमानी जमीन. यातील बायजा दलित कुटुंबातील आहे. मुलांवर प्रेम करणारी माता. पोराने खूप शिकावे असे वाटते, शाळेत जाणाऱ्या पोराचे कौतुक करणारी, प्रसंगी कठोरपणे वागून संस्कार करणारी, पती सायबा मुंबईला कतलखान्यात नोकरी करणारा, बायजा गावाला एकटी राहून नवऱ्यावर आतोनात प्रेम करणारी,पतिव्रता जीवन जगणारी, बायजाशी मनबा लगट करू इच्छितो, तेव्हा खंबीरपणे सात्विक चारित्र्याची बायजा मनबाला बदडून काढते. बायजा धर्मासाठी, गावासाठी व पोटासाठी येसकरवणाची परंपरा चालविते व गावभर मागत फिरते, तेव्हा इतर बायका तिला बडबड करतात. यातून सामाजिक विषमतेचे चित्रण दिसते. गावातील टिपऱ्यांच्या खेळात ती महार असल्याने तिला भाग घेता येत नाही ती जातीय विषमतेचे चटके सहन करते.

**व्यंकटेश माडगूळकर- करूणाष्टक** (1982-) आईभोवती गुंफलेल्या तिच्या आठ मुलांच्या भावबंधाचे हे करुणाष्टक आहे. नवऱ्याच्या नोकरीमुळे आईला गावोगावी फिरावे लागते. मुलांच्या उपासमारीवर ती गोसाव्याकडून पीठ मागते. मुलांवरील प्रेम, तिची आगतिकता, दारिद्य यात स्पष्ट दिसते. महाराष्ट्रातील प्लेगची साथ, दुसऱ्या महायुध्दाची झळ, गांधीवधाचा उद्रेक, या सर्वाचा परिणाम आईवर होतो. दारिद्य, उपासमार, मुलांचे असह्य जगणे यामुळे ती अगतिक झालेली आहे. आईचा आदर्श माता म्हणून सत्कार झालेली एक कर्तृत्वान स्त्री, नात्या-गोत्यात प्रसिद्ध असलेली, स्वाभिमान टिकवून ठेवणारी, काबाडकष्ट करणारी संसारी, पतिव्रता, सात्विक जीवन जगणारी आहे. सासूच्या आजारपणात ती सासूची सेवा करते, घरगुती औषधोपचार करूनही सासू मरण पावते तेव्हा तिला फार वाईट वाटते. सासऱ्याबाबत तिच्या मनात फार आदर, आपलेपणा 'मला पोटच्या मुलीसारखं वाढवलं' यातून दिसतो. तिला सासरघरी प्रेम मिळते.

मुलाबाळांमध्ये रमणारी आई, नवऱ्यापुढे आगतिक होते. पती निधनानंतर मुलांसाठी, संसारासाठी काबाडकष्ट करणाऱ्या, प्रतिकुल परिस्थितीत तग धरून मुलांच्या सुखात सुख मानणाऱ्या ग्रामीण स्त्रीचे प्रतिनिधीत्व ती करताना दिसतात.

**गणेश आवटे- गणगोत** (1984)- ही मराठवाड्यातील ग्रामीण कुटुंबाचे जीवनदर्शन घडवणारी कादंबरी आहे.ग्रामीण भागातील नातीगोती,मानपान, बेगडी प्रतिष्ठा व त्यामधून कुटुंबातील एखाद्या स्त्रीची होणारी शोकांतिका हा या कादंबरीचा विषय आहे. यात आंजू ही सासूरवाशीण सोशिक, समंजस, संयमी तर तिची रांगडी सासू, अल्लड नणंद, सुशाबाई, आंजूची आजारी हतबल आई साकारली आहे. या घराण्यातील सून आंजूच्या भावजीवनाची ही कथा आहे.

**बा.ग.केसकर-कुणाच्या खांद्यावर** (1984)- यात उसतोडणी कामगारांच्या समस्या मांडल्या आहेत. सहकारी साखरकारखानादारीतील शोषण हे केंद्रस्थानी असल्यामुळे मल्हारीची बायको सुरवंता वहिनी या उसतोडणी मजूर स्त्रियांचे चित्रण स्वाभाविकपणे दुय्यमस्थानी जाते. यात सुरवंताची वाताहत रेखाटली आहे. उसतोडणी कामगारांना किती कष्टाचे, दुदैवी जीवन जगावं लागतं, विशेषतः त्यांचे कौटुंबिक जीवन किती व कसं उद्ध्वस्त होते, याचे यथार्थ चित्रण यात आलेले आहे.कारखानदार, ठेकेदार,मुकादम व सरकारी भांडवलदारी अर्थव्यवस्थेमुळे, कामगारांचे होणारे शोषण,यामुळे नशिबी आलेले दु:ख, दैन्य, दारिद्र्याचे प्रभावी दर्शन या कादंबरीतून घडते.

**बाबाराव मुसळे- हल्ल्या हाल्ल्या दुध दे**(1985)- यात न्यानबाची शोकांतिका व नात्यातील फोलपणा, सावकारी पाश चित्रित केलेला आहे. न्यानबा मुळे या सामान्य शेतकऱ्याची ही कथा, तशी फारशी नवीन नसलेली. मुलीच्या लग्नासाठी न्यायबा सावकाराला शेताचे खरेदीखत लिहून देतो आणि त्याच्या नष्टचर्याला सुरुवात होते. सरकारी योजनाही त्याला या आपत्तीतून सोडू शकत नाही, उलट सरकारी नोकर आपल्यासारख्या अडाण्यांना फाडून खायला टपून बसलेले आहेत, असा अनुभव त्याला येतो. जिच्या लग्नासाठी कर्ज काढले तिला संसार सुख मिळत नाही. ती माहेरी निघून येते, त्यातच ज्ञानबाला कॅन्सर होतो, जावयाला वेड लागते अशा अनेक दुर्दैवी घटना घडत जातात. त्यासाठी ज्ञानबा आपल्या दैवाला दोष देताना दिसतो. तो विचार करतो, आपण हल्ल्याचे दूध मागत राहिलो आणि शेवटी सगळा सत्यानाश पहावा लागला.

**राजन गवस – चौंडकं** (1985)- यात जोगतिणीचे भावविश्व चित्रित केले आहे. अंधश्रद्धेमुळे सुली, बायजाक्का, शेवंता, गंगूबाई, तानु, फुली या स्त्रियांची होणारी समजमान्य वाताहत येथे केंद्रस्थानी आहे. या कादंबरीत जोगतीण व तिच्या जीवनाचे दु:खभोग चित्रित केले आहे. केवळ केस विंचरताना बायजाला करक भरते आणि संसारात पुरे पडत नाही. एवढ्या कारणावरून सुलीला देवदासी म्हणून सोडले जाते. एकदा घरात घुसल्यावर बाहेर न पडणारी ही देवी आपल्या देव्हाऱ्यात पुजू नये, असे सुभानाला वाटते. परंतु बायजाचा आणि हटिणीच्या अक्कू जोगतीणी पुढे त्याचा विरोध दुबळा ठरतो. देवदासी म्हणून सोडलेली सुली समाजाची भोग वस्तू ठरणार ही तिची नियती अटळच होती. परंतु ते सत्य समोर येताच सुभाना उद्ध्वस्त होतो. बायजा मरण कवटाळते.

**उत्तम बंडू तुपे – झुलवा** (1986)- 'लावला तर झुलवा नायतर कुणीबी हलवा' असे जीने वाटयाला आलेल्या परंतु शेवटी परिस्थिती विरुद्ध बंड करून उठलेल्या या जगन जोगतीणीची कथा उत्तम बंडू तुपे यांनी रेखाटली. थोडेफार शिकून नर्स व्हावे एवढीच आकांक्षा असलेल्या जगनला प्राप्त परिस्थितीत जोगतीण व्हावे लागते. पावलोपावली तडजोडी करूनही ती सुखी होऊ शकत नाही. केवळ दैहिक पातळीवर जगणाऱ्या भोवतालच्या माणसात जगन एकाकी होते. तिचे दुबळे हात परिस्थिती बदलू शकत नाही, तिची घालमेल लेखकाने प्रत्ययकारीपणे रेखाटली आहे. स्वत:चे जीवन उद्ध्वस्त झालेले असूनही जगन जयंता, कृष्णा यांना सावरते कुंकवाचा धनी असावा म्हणून कृष्णाशी झुलवा लावते. त्याच्यापासून झालेल्या मुलीचे संगोपन करताना बाईपण घालवून निदान आईपण जगावे, असे तिला वाटते. जिच्या कृपेने हे आयुष्य वाट्याला आले त्या यल्लमा वरचा तिचा विश्वास कधीच उडाला आहे. परिस्थितीविरुद्ध बंड करून देवीचा जग नदीच्या पुरात भिरकावणाऱ्या जगनची व्यक्तिरेखा लेखकाने उभी केली. तसेच दारशी, येलू, परसू या व्यक्तिरेखाही प्रत्ययकारी उतरल्या आहेत.

**आनंद पाटील- कागूद आणि सावली** (1986) यातून ग्रामजीवनावर भाष्य करतात. नानी, आजी, आई, तानू, आंबू, जना घरातील स्त्रियांना नगन्य स्थान आहे. त्यांचा

भावनिक कोंडमारा होतो. आनंद पाटलांच्या या दोन लघू कादंबरी आहेत. एखादे शेत खरेदी करताना, त्याचे खरेदीखत करून घेताना, शेतकऱ्यांना किती अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते, त्याचे वास्तवतापूर्ण चित्रण 'कागद'मध्ये आले आहे. घटना नित्याची आणि साधीच परंतु ग्रामीण माणसाची आणि त्याच्या जीवनाचे अस्सल दर्शन घडवून जाते. तर 'सावली'मधील जीवनानुभव अस्सल ग्रामीण. घर बांधून देण्याच्या व्यापात खेड्यातल्या एका गरीब कुटुंबांचे प्राण कसे कंठाशी येतात, याची चित्रण या कादंबरीत आले आहे. धोंडीबा, राम मुंबईतल्या गिरणी कामगारांच्या बेमुदत संपामुळे गावाकडे निघून येतात आणि संप मिटेपर्यंत घर तरी बांधून घेऊ म्हणून कामाला लागतात. त्यासाठी एका मागून एक अशा कित्येक अडचणी त्यांच्यापुढे उभे राहतात.

**वासुदेव मुलाटे—विषवृक्षाच्या मुळ्या**(1989)- यात विश्वनाथ तरटची पत्नी स्मिता प्रेमळ, सुखदु:खात साथ देणारी, तर कर्मठ आई रेखाटली आहे.1980 नंतरच्या ग्रामीण कादंबरीत खेड्यात नव्याने उदयाला आलेल्या वर्गाचे ग्रामीण जीवनातील स्थित्यंतरे, अस्थिरता, शेतकरी आंदोलन या सर्वांचे चित्रण यात येते. ही सहकारी चळवळीचे रूप स्पष्ट करणारी कादंबरी. सहकार चळवळ खरंतर कोणासाठी तर सर्वसामान्य लोकांचा आर्थिक विकास साधण्यासाठी पण या चळवळीतून आधीच सधन असलेल्यांचा कसा विकास साधला जातो, हे विदारक सत्य आपल्याला दिसते. ग्रामीण भागातील तळागाळातील लोकांची प्रगती व्हावी, त्यांनी आर्थिक स्थिरता मिळावी, यासाठी सहकार चळवळीचा महाराष्ट्रात जन्म झाला. पण भ्रष्टाचाराबरोबरच सहकार क्षेत्रातील बजबजपुरी, शूद्र मनोवृत्तीचा नोकरवर्ग आणि राजकीय स्वार्थासाठी या सहकाराचा होत असलेला वापर आणि विषण्ण असलेले समाजमन याचे चित्रण कादंबरीत येते.

**निष्कर्ष:-**

1 ग्रामीण कादंबरीतून खास स्त्रीचे चित्रण करण्यासाठी लिहिलेल्या नाहीत.
2 काबाडकष्ट करणाऱ्या, सोशिक स्त्रीचे चित्रण येते.
3 अन्यायाविरूद्ध बंडखोरी करताना दिसत नाहीत.
4 या स्त्रियांमध्ये घरंदाजपणा दिसतो.
5 राजकारण, समाजकारण असलेल्या कुटुंबातील स्त्रियांना नगण्य स्थान आहे.
6 विधवा परित्याक्ता, वेश्या, कलावंतीण अशा स्त्रीचे वेगळे रूप दिसते.
7 गावगाड्याच्या अनुषंगाने अस्पृश्य व विविध जाती-जमातीतील स्त्रियांचे चित्रण आले आहे.
8 कौटुंबिक नातेसंबंधाला महत्त्व हे ग्रामजीवनातील महत्त्वाचे वैशिष्ट्ये दिसते.

**संदर्भ ग्रंथ:-**

1 ग्रामीण साहित्याची चळवळ,डॉ. र्किती मुळीक, स्नेहवर्धन प्रकाशन,प्रथमावृत्ती जाने.2011,पृ.66
2 ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, संपा.चंद्रकुमार नलगे, अजब प्रकाशन,प्रथमावृत्ती ऑग 2009,पृ.57
3 मराठी ग्रामीण कादंबरी, डॉ.रवींद्र ठाकूर, मेहता पब्लिशींग हाऊस,प्रथमावृत्ती नोव्हें 1993,पृ 96
4 ग्रामीण कादंबरीतील स्त्री, डॉ. मोहन पाटील,स्वरूप प्रकाशन, प्रथमावृत्ती मार्च 2010,पृ 43
5 ग्रामीण साहित्य:एक चिंतन, द.ता.भोसले, मेहता पब्लिशींगहाऊस,प्रथमावृत्ती नोव्हें 1988,पृ.8
6 ग्रामीण साहित्य आणि वास्तव, डॉ.आनंद यादव,मेहता पब्लिशींग हाऊस,पुनर्मुद्रण 2010,पृ.44